# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*

# 'कोयना ॲकॅडमीच्या यशाची परंपरा कायम–पाटणकर

वार्ताहर

पाटण

स्पर्धात्मक युगात जेईई, आयआयटी तसेच वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठी नीट सारख्या परीक्षांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त आहे. यासाठी जोखीम पत्करुन मुलांना कराड, पुणे, मुंबई, सांगली, लातूरपासून ते राजस्थानातील कोटा यासारख्या शहरात लाखो रुपये खर्च करुन ठेवावे लागत असताना त्या तुलनेत कोयना ॲकॅडमीमधील विद्यार्थी अत्यंत कमी खर्चात, जोखीम न घेता पालकांच्या डोळ्यासमोर जेईई, आयआयटी, नीटसारख्या परीक्षेत यश संपादन करीत आहेत. येथील विद्यार्थी अभियांत्रिकी, वैद्यकीय व आयआयटीला जात आहेत हे अभिमानास्पद असून कोयना ॲकॅडमीच्या यशाची परंपरा यापुढेही कायम राहील, असा विश्वास कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांनी व्यक्त केला.



पाटण : यशस्वी विद्यार्थी व पालकांचा सत्कार प्रसंगी अमरसिंह पाटणकर, संजीव चव्हाण, प्राध्यापक व मान्यवर.

कोयना एज्युकेशन सोसायटीच्या कोयना ॲकॅडमी मधील विद्यार्थ्यांनी जेईई मेन्स परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केल्याबद्दल आयोजित सत्कार समारंभप्रसंगी ते बोलत होते. संस्थेचे संचालक संजीव चव्हाण, प्रा. बी.एन. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या चेतन मोरेसह ओंकार कदम, अथर्व राऊत, निखिल जाईगडे व सोहन सूर्यवंशी या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

पाटणकर पुढे म्हणाले, शिक्षणासाठी लाखो रुपये खर्च करुन मुलांना बाहेरील जिल्ह्यात, राज्यात ठेवण्यात येत असताना संस्थेने कोयना ॲकॅडमी सारखे अद्ययावत, गुणवत्तापूर्ण शैक्षणिक दालन उपलब्ध करुन दिले आहे. पालकांनी दाखवलेला विश्वास येथील शिक्षकांनी तसेच विद्यार्थ्यांनी सार्थ ठरवून अभिमानास्पद कामगिरी केली आहे.

संजीव चव्हाण म्हणाले, कोयना ॲकॅडमीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अद्ययावत सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. जेईई तसेच नीट परीक्षेसाठी शिक्षक व विद्यार्थी कष्ट घेत आहेत.

यावेळी चंद्रकांत मोरे, संजय इंगवले, राजाभाऊ कांबळे, बाळासाहेब पंवार, बळीराम सुर्वे, अनिल बोंबे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी विजयसिंह पाटणकर, धैर्यशील पाटणकर, पंडितराव मोरे, अनिल भोसले, प्रकाश जाधव, लक्ष्मण चव्हाण उपस्थित होते. प्रा. सत्यजित माने यांनी स्वागत केले. प्रा. पूनम पाटील यांनी सुत्रसंचालन केले. चंद्रशेखर ढवळे यांनी आभार मानले.